आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३ एप्रिल २०२४ - बुधवार

२०२४ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होईल, असा सुधारित अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. येत्या दोन वर्षांत दक्षिण आशिया हा विभाग जागतिक पातळीवर सर्वाधिक विकसनशील विभाग ठरेल आणि २०२५ या वर्षात त्याचा विकासदर सहा पूर्णांक एक दशांश टक्के असेल, असंही या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज लोकसभा निवडणुकांसाठी आपल्या चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.

कल्याण लोकसभा मतदारसंघातून वैशाली दरेकर, पालघर लोकसभा मतदारसंघात भारती कामडी, जळगाव लोकसभा मतदातसंघासाठी करण पवार आणि हातकंणगले मतदारसंघात  सत्यजित पाटील यांना उमेदवारी दिल्याचं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडीनं लोकसभा निवडणुकीसाठी आणखी पाच उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. नांदेडमधून अविनाश भोसीकर, परभणीमधून बाबासाहेब उगाळे, संभाजा नगरमधून अफसर खान तर पुण्यातून वसंत मोरे आणि शिरूरमधून मंगलदास बागुल यांना उमेदवारी मिळाली आहे. वंचित बहुजन आघाडीनं बारामतीमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना पाठिंबा दिला आहे.

**<><><><><>**

जळगावचे भाजपचे खासदार उन्मेष पाटील यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यांच्या सोबत जळगाव मधल्या अनेक पदाधिकाऱ्यांनीही

शिवसेनेत प्रवेश केला आहे. उन्मेष पाटील यांना जळगाव लोकसभा मतदारसंघातून भाजपची उमेदवारी मिळाली नसल्यामुळं ते गेल्या काही दिवसांपासून नाराज होते.

<><><><>

केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी कलपेट्टा इथं ं एका रोड शोचं नेतृत्व केलं. त्यांच्यासोबत पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी, के सी वेणुगोपाळ आणि इतर नेते उपस्थित होते.

<><><><>

केंद्रीय मंत्री डॉ. एल मुरुगन यांच्यासह राज्यसभेच्या ११ सदस्यांना उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज पद आणि गोपनियतेची शपथ दिली. महाराष्ट्रातल्या मेधा कुलकर्णी आणि चंद्रकांत हंडोरे यांचाही त्यात समावेश आहे. या आठवड्यात  माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्यासह वरिष्ठ सभागृहातले ५६ सदस्य निवृत्त झाले आहेत.

<><><><>

इयत्ता पहिली, दुसरी, सातवी, आठवी, दहावी आणि बारावीची ३३ लाख शालेय पाठ्यपुस्तकं देशभरातल्या पुस्तक विक्रेत्यांकडे पाठवल्याचं एन सी ई आर टी, अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं म्हटलं आहे. अन्य इयत्तांची पुस्तकं या महिन्यात उपलब्ध होतील. बाजारात पुस्तकं उपलब्ध नसल्याच्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर परिषदेनं हे स्पष्ट केलं.

<><><><>

छत्रपती संभाजीनगर मधल्या छावणी परिसरातल्या एका तीन मजली इमारतीला आज लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू झाला. यात ३ महिलांसह २

बालकांचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेतली.

**सोलापूर** इथल्या अक्कलकोट रोडवरच्या अन्नपूर्णा टॉवेल कारखान्याला आज सकाळी आग लागली. या दोन्ही ठिकाणची आग आटोक्यात आली आहे.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यात हट्टा जवळ चिखली फाटा इथं आज सकाळी कार आणि दुचाकीच्या अपघातात आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहतूक ठप्प झाली होती.

भंडारा जिल्ह्यात तुमसर सिहोरा राज्यमार्गावर डोंगरला इथं आज सकाळी भरधाव ट्रकनं दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार ठार झाला आहे.

**<><><><><>**

मुंबई- पुणे महामार्गावर सर्व प्रकारच्या हलक्या आणि अवजड वाहनांची वाहतूक उद्या दुपारी १२ ते २ या वेळेत पूर्णतः बंद असेल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत या महामार्गावर गॅन्ट्री बसवण्यात येणार असून या वेळेत प्रवासासाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा असं आवाहन महामंडळाने केलं आहे.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाच्या बीड लोकसभा मतदार संघाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी मंगळवारी रात्री रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची त्यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी भेट घेतली. या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा मुंडे यांना पूर्ण पाठींबा असेल, असं आठवले यांनी या भेटीदरम्यान स्पष्ट केलं.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्याच्या अनेक भागात उद्भवणाऱ्या पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन झाला आहे. या कक्षातल्या ८२३७९७८८७३ आणि ०२५२५-२९७४७४ या क्रमांकांवर संपर्क साधावा. जिल्ह्यात उन्हाचा कडाका वाढून पारा ३४ ते ३६ अंशावर पोहचल्यानं शीतकारक फळांची मागणी वाढली आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट राईडर्सशी होणार आहे. वाय एस राजशेखर रेड्डी क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

//<><><><><>//